# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक २२ एप्रिल, २०२१


**अधिसूचना**

क्रमांक: ४३/२०२१ दिनांक : २२.०४.२०२१

**विषय :- २०२१-२२ या शैक्षणिक सत्राचे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून संलग्निकरण अर्ज (Online) भरण्याबाबतच्या अंतिम तिथीबाबत..**

संदर्भ : १. विद्यापीठ निदेश क्र.१६/२०२०, दि.१२.१०.२०२०
२. विद्यापीठ अधिसूचना क्र.१/२०२१, दि. ०२.०१.२०२१
३. विद्यापीठ अधिसूचना क्र.१३/२०२१, दि. २१.०१.२०२१

ज्याअर्थि, उपरोक्त संदर्भांकीत निदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१)(ट) प्रमाणे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करण्याबाबतची तरतूद आहे. सदर तरतुदीस अनुसरुन अधिष्ठाता मंडळाने विद्याविषयक लेखापरिक्षण मानके व कार्यप्रणाली तयार केली असून, विद्यापीठाच्या प्राधिकारीणीने त्याला मान्यता प्रदान केली आहे व त्याअनुषंगाने निदेश क्र.२२/२०२१, दि. ०५.०४.२०२१ निर्गमित करण्यात आला आहे.

आणि

ज्या अर्थी, उपरोक्त संदर्भांकीत अधिसूचना अन्वये ज्या महाविद्यालयाचे विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखेचे संलग्निकरण संपलेले आहे. अशा महाविद्यालयांनी सत्र २०२१-२२ पासून विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करावयाचे आहे. याकरीता सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संबंधीत पात्र महाविद्यालयांनी संलग्निकरण अर्ज (Online) भरण्याची अंतिम तिथी ८.२.२०२१ पर्यंत अधिसूचित करण्यात आली होती.

आणि

ज्या अर्थी, संलग्नित महाविद्यालयाच्या अडचणी लक्षात घेता, सॉफ्टवेअरच्या माध्यमातून संबंधीत पात्र महाविद्यालयांनी संलग्निकरण अर्ज (Online) भरण्याची अंतिम तिथी २६ एप्रिल, २०२१ पर्यंत राहील.

आणि

ज्या अर्थी, ज्या महाविद्यालयांना कायम संलग्निकरण प्रदान करण्यात आलेले आहे अशा महाविद्यालयांना संलग्निकरण अर्ज (Online) भरण्याची आवश्यकता नाही फक्त संलग्निकरण शुल्क हे विद्यापीठ निदेश क्र.३९/२००४, दि.२०.१०.२००४ नुसार भरण्यात यावे तथापि, ज्या विषय/अभ्यासक्रमांना कायम संलग्निकरण देण्यात आलेले नाही अशा विषय/अभ्यासक्रमाकरीता सदर संलग्निकरण अर्ज (Online) भरावयाचा आहे.

तसेच (Online) अर्ज भरण्याबाबत सविस्तर माहिती www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या संकेत स्थळावर देण्यात आलेली आहे व सदर माहिती १. https://youtu.be/rO_VO64doDk २. https://youtu.be/eujV_wu_ta8 ३. https://youtu.be/XqKAe6zCuNO वर क्लिक करुन बघता येईल.

अर्ज (Online) भरण्यास खालील पध्दतीचा वापर करण्यात यावा.

१. www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाणे.
२. Online Service वर क्लिक करणे.
३. Online Application for Continuation of Affiliation वर क्लिक करणे.
४. Login करताना प्रथम Register वर क्लिक करुन स्वतःच्या महाविद्यालयाची नोंदणी करुन घेणे.
५. नोंदणी केलेल्या महाविद्यालयांनी सरळ Login करावे.
६. Continuation of Affiliation वर Click करावे.
७. अर्ज भरताना अडचण आल्यास मो.नं. ९५२७०५०६१७ / ७२४९४१९०४०/ ०७२१-२५६६२४५ या दुरध्वनी नं. वर संपर्क करुन माहीती मिळविता येईल.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ